महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या बेलापूर, सीबीडी येथील नियोजित इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मलोआ -१११९/प्र.क्र.८८/आठ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ जून, २०१९

वाचा:-

१. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.साबांज-२०१५/प्र.क्र.१५२/मिव्य-१, दि.०४ डिसेंबर, २०१८
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मलोआ-१११८/प्र.क्र.३२७/(१)/का-०८, दि.२५.०१.२०१९
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे पत्र क्र.सीबीडी-०११९/सीआर-०१/२०१९/पाच, दि.२० मे,२०१९
४. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१० जून, २०१९ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना:-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या नियोजित इमारतीच्या बांधकामाकरीता संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये बेलापूर, सीबीडी येथे ४७५७.४४ चौ.मी. भूखंड उपलब्ध करून दिला आहे. सदर भूखंडाचे सरंक्षण करण्यासाठी त्याभोवती संरक्षक भिंत तातडीने बांधणे आवश्यक असल्याने त्यासाठीच्या आयोगाने सादर केलेल्या खर्चाच्या प्रस्तावास संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि त्यानंतर भूखंडावर करावयाच्या इमारत बांधकामासाठी उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून अंदाजपत्रकाची मागणी केली असता त्यांनी असे सूचित केले की, संरक्षक भिंतीच्या बांधकाम इजा होवू नये यास्तव, मूळ इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. यास्तव सदर भूखंडावरील इमारतीच्या बांधकामासह संरक्षक भिंत बांधणे यासाठीचा एकत्रित प्रस्ताव आयोगाने संदर्भाधीन क्र.३ च्या पत्राद्वारे प्रशासकीय मान्यतेस्तव या विभागास सादर केला. त्यामुळे या विभागाने यापूर्वी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये संरक्षक भिंत बांधण्यासाठी दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात येत आहे.

सबब, आयोगाकडून संदर्भाधीन क्र.३ च्या पत्राद्वारे सदर भूखंडावर संरक्षक भिंतीसह नियोजित कार्यालयीन इमारत बांधकामासाठी उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी सादर केलेले अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या नियोजित इमारतीचे बांधकाम व संरक्षक भिंत बांधकामाकरीता रु.**९७,४६,९६,५०४/-** इतक्या अंदाजपत्रकास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम रूपये
अ)	कार्यालयीन इमारतीच्या बांधकामाचा निव्वळ खर्च	५९,०५,८३,१४९
ब)	**बांधकामाव्यतिरिक्त इतर अनुषंगिक आवश्यक बाबी**	
	इंधन गॅस पाईपलाईन	५०,०००
	बायो डायजेस्टर	१०,००,०००
	रेन वॉटर हारवेस्टिंग	२५,००,०००
	सौर ऊर्जा छत	१५,००,०००
	अपंगांसाठी रॅम्प	५,००,०००
	पाणी पुरवठा व इतर अनुषंगिक	२,९५,२९,१५७
	विद्युतीकरण व आग प्रतिबंधक यंत्रणा	८,४९,६४,१४६
	एकूण	१२,००,४३,३०३
क)	**संकीर्ण बाबी**	
१	संरक्षक भिंत व फाटक	३०,००,०००
२	अंतर्गत रस्ते	४५,३७,५००
३	पार्किंग	२५,००,०००
४	डेव्हलपमेंट ऑफ ग्राऊंड	१०,००,०००
५	लँड स्केपिंग	२५,००,०००
६	सीसी ड्रेन्स आणि सी/डी वर्क्स	५०,००,०००
	एकूण	१,८५,३७,५००
ड)	**वैकल्पिक बाबी**	
१	भूमिगत पाण्याची टाकी (R/W Harvesting)	१०,००,०००
२	पंप हाऊस, बोअरवेल इ.	१२,००,०००
३	वातानुकुलित यंत्र	४०,००,०००
४	उद्वाहन	१,००,००,०००
५	बाहय प्रसाधनगृह	५,००,०००
६	एबी रुम, पंप, जनरेटर इ.	२५,००,०००
७	सी.सी.टी.व्ही.	२०,००,०००
८	लॅन/वॅन	५०,००,०००
	एकूण	२,६२,००,०००
	एकूण (अ+ब+क+ड)	७५,५३,६३,९५२
इ)	**बांधकामासह एकूण खर्चावरील कर व भविष्यातील अपेक्षित वाढीव खर्चाच्या बाबी**	
	आकस्मिक खर्च (अ येथील बांधकाम खर्चाच्या ४%)	२,३६,२३,३२६
	हरित इमारत (अ येथील बांधकाम खर्चाच्या ५%)	२,९५,२९,१५७
	वस्तू व सेवा कर (अ+ब+क+ड या एकूण प्रकल्प खर्चाच्या १२%)	९,०६,४३,६७४
	खर्च वाढ (अ+ब+क+ड या एकूण प्रकल्प खर्चाच्या १०%)	७,५५,३६,३९५
	एकूण	२१,९३,३२,५५२
	एकूण (अ+ब+क+ड+इ)	९७,४६,९६,५०४

२. ही प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) नमूना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही- २०१३/प्र.क्र.१७७ / तां.क्र.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) सर्व संबंधित स्थानिक संस्था/प्राधिकरणे यांची मान्यता घेण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.३०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

६) तांत्रिक मंजूरी देताना राज्य दरसूचीबाहय बाबींच्या दराकरिता शासन परिपत्रक क्रमांक-२०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दि.११.०४.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

७) प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

८) स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

९) इमारतीमध्ये दिव्यांगाकरिता उपलब्ध करुन द्यावयाच्या विविध सोयींबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

१०) विषयांकीत कामाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही. याद्दष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

३. यासाठी होणारा खर्च हा सामान्य प्रशासन विभागाच्या मागणी क्र.ए-९, ४०७०-इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००-०५१-बांधकाम (००)(०१)-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम, ५३-मोठी बांधकामे (४०७० ०३११) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. मात्र, अर्थसंकल्पात तरतूद केल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येवू नये.

४. हे आदेश मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दि.१०.०६.२०१९ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-२३/२०१९/ईमारती-१, दि.१०.०६.२०१९ नुसार त्या विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२ दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक-१, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१४१२३९१९५८०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Pandurang Wagh

Digitally signed by Rajendra Pandurang Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b2370430433845720a9c4c8107, serialNumber=7adb1868a49b8719e27d3453044671a8ceddbd04af26dd2089ed03e6b1bd92bd, cn=Rajendra Pandurang Wagh
Date: 2019.06.14 17:18:31 +05'30'

(राजेंद्र वाघ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव(नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
९. उप विभागीय अभियंता ,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोकण भवन, नवी मुंबई
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. कार्यासन (व्यय-४, अर्थ-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. कार्यासन (का-१४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. कार्यासन (इमारती-१), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. निवडनस्ती (का-८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.